http://amrutmanthan.wordpress.com/ दैनिक पुढारी, २८ फेब्रुवारी २०१०



बहार

महाराष्ट्राबाहेरील महाराष्ट्र

निनाद बेडेकर
विख्यात इतिहाससंशोधक व लेखक

# लाहोरवर कब्जा

इ. स. १७५६-५८ मध्ये घडलेल्या या गोष्टी आहेत. यावेळी रोहिलखंडात नजीबखानाचा उदय झाला होता. हा मोठा 'खेळ्या' होता. त्याला मराठ्यांचे दिल्लीवरील वर्चस्व नको होते. अफगाणांचे हवे होते. मल्हारराव होळकराने याला धर्मपुत्र मानले होते. अहमदशाह अब्दाली आणि दिल्लीचा बादशाह यांच्यात समन्वय साधणारा मीरमन्नू हा १७५३ मध्ये लाहोरास मृत्यू पावला. त्याची बायको मुघ्लानी बेगम ही महाखटपटी, व्रात्य आणि दुराचारी बाई होती. तिने वजीर गाझीउद्दीन याचा सूड घेण्याचे ठरवले. तिने अफगाणिस्तानचा बादशाह अहमदशाह अब्दाली याला बोलावून वजीर वगैरेंचा काटा काढण्याचे ठरवले. या कारस्थानात नजीबखान रोहिला सामील झाला. त्याला अब्दाली इथे हवा होताच. दिल्लीत मलिका जमानीचे प्रस्थ होते. बादशाही जनान्यात बऱ्याच बायका होत्या. त्यांना खर्चाला पैसे कमी पडत होते म्हणून त्यांचाही वजिरावर राग होता. राजपुतांचाही या सगळ्यांना पाठिंबा होता.

अब्दालीला दिल्लीचे आमंत्रण मिळाल्यावर अत्यानंद झाला. दिल्ली झोडायची त्याची मनिषा होतीच. इतक्या मंडळीचा पाठिंबा पाहिल्यावर आणि मराठी फौजा दिल्लीहून परत गेल्याचे पाहिल्यावर तो तडक पेशावरला आला. लाहोरास अदिनाबेगचा पराभव करून अफगाणांनी लाहोर, सतलजपर्यंतचा मुलूख ताब्यात घेतला. ५ जानेवारीला सरहिंद घेऊन तो २२ जानेवारी १७५६ मध्ये दिल्लीत आला.

अब्दाली दिल्लीत आल्याचे कळताच दिल्लीत धांदल उडाली. वजीर गाझीउद्दीनने अंताजी माणकेश्वरला ग्वाल्हेरहून बोलावले; पण त्याच्याकडे कमी फौज होती. जाटांनी आणि दरोडेखोरांनी दिल्लीहून पळणाऱ्या लोकांना लुटावयास सुरुवात केली. अब्दालीचे वकील दिल्लीत आले. त्यांची दोन कोट रुपयांची मागणी ऐकताच वजीर सुन्न झाला. मुघ्लानी बेगमेच्या पाया पडून त्याने तिच्याकरवी अब्दालीस परत जाण्याच्या विनवण्या केल्या. अब्दालीने ते करण्याच्या बदल्यात सरहिंद पावेतो मुलूख मागितला. ते ऐकल्यावर वजीर हतबुद्ध झाला. तेवढ्यात पानिपताहून पुढे आलेल्या अब्दालीच्या सेनापतीस नजीबखान रोहिला त्याच्या सेनेसमवेत सामील झाला. वजिराची काळजी वाढू लागली.

मुघ्लानी बेगमेने दिल्लीतील संपत्तीची बित्तंबातमी अब्दालीस पुरवली होती. तिला हाताशी धरून अब्दालीने पुढच्या चालींना सुरुवात केली. दिल्लीत कोणाकडे किती धन आहे, कोणाकडे सुंदर मुली आहेत, बादशाही जनान्यात सुस्वरूप मुली कोण आहेत याची खडानखडा माहिती मुघ्लानी बेगमने अब्दालीस पुरवली. अब्दालीने तिच्यावर खूश होऊन, 'तुला मी पुत्र समजून सुलतान मीर्झा' हे पद देतो, असे सांगून तिला आपल्या अंगावरचा कलगीतुरा इत्यादी समग्र पोशाख दिला. अर्थात कार्यभाग साधल्यावर त्याने तिला पुढे झिडकारून दिले. 'माझ्याशी लढायला कोणीच का येत नाही', असे म्हणत त्याने वजिराला शिव्यांची लाखोली वाहिली आणि दिल्ली लुटावयास प्रारंभ केला. धनिकांपासून गोरगरिबांपर्यंत त्याने संपत्ती उकळली. अमिरांच्या हवेल्यात खणत्या लावल्या. प्रचंड लूट त्याने आपल्या मुलासोबत लाहोरास पाठवली. मग त्याची नजर स्त्रियांवर पडली. हजारो स्त्रिया भ्रष्टवल्या गेल्या. कित्येकींनी पाण्यात उड्या टाकून प्राण दिले. अब्दालीने हिंदू स्त्रिया बाटवून आपल्या लोकात वाटल्या. पठाणांनी घर नि घर लुटले. बादशाहाच्या जनान्यातल्या स्त्रियांशी निका लावून त्यांना नेले. दिल्लीत कल्लोळ उडाला.

अंताजी माणकेश्वराने आपल्या थोड्या फौजेनिशी अब्दालीच्या फौजेचा प्रतिकार केला. पण त्याचा काही एक उपाय चालला नाही. दिल्लीच्या खबरा पुण्यास येतच होत्या. पेशव्याने पुण्याहून रघुनाथराव आणि मल्हारराव यांना अब्दालीवर रवाना केले. या दोघांचाही अब्दालीशी सामना देण्याचा विचार नव्हता. तो इंदोरास येईस्तोवर अब्दालीने दिल्ली साफ केली.

अब्दाली मथुरेत आला. अटकपासून इथपर्यंतचा प्रदेश त्याने उजाड करून टाकला होता. आता मथुरा त्याच्या तावडीत सापडली. यमुनेच्या दोन्ही काठांनी अफगाण सैनिक चालून आले. दिल्लीसारखीच मथुरेची गत झाली. होळीच्या आठवड्यात पठाण रक्ताचा रंग खेळले. मथुरेचे रस्ते आणि यमुना लालेलाल झाली. मथुरेत प्रेतांचे ढीग पडले. मुंडक्यांचे मीनार उभे राहिले. अब्दालीच्या क्रौर्याचा एक प्रकार तर फार भीषण होता. गाईंची मुंडकी मारून त्यांची तोंडे माणसांच्या तोंडाला लावून ती झाडांना टांगून ठेवली होती. अब्दालीने मथुरा हे हिंदूचे क्षेत्र म्हणून त्याने तेथे मोठी कत्तल उडवली. प्रत्येक मुंडक्याला पाच रुपये त्याने दिले. त्यामुळे मुंडक्यांच्या राशी उभ्या राहिल्या. घरे लुटून जाळून टाकली. तरण्याताठ्या मुली पळवून नेल्या. बैरागी उभे राहिले. त्यांचीही कत्तल अब्दालीने उडवली. गोकुळाचीही गत तीच झाली.

मराठी फौजा जयपुरापर्यंत आल्याची खबर अब्दालीला मिळाल्याने त्याने मथुरा आवरती घेतली. लूट त्याने आधीच पाठवून दिली. मुघ्लानी बेगमेला त्याने हाकलून दिले. त्याचा वजीर शाहवलीखानने तर तिला काठीने झोडपले. मुघ्लानीची अवस्था फारच वाईट झाली.

नादिरशाहाच्या कत्तलीची आठवण लोकांना झाली. अब्दालीची कत्तल तर नादिरशाहाला मागे टाकेल अशी झाली. अब्दाली परत गेल्यामुळे नजीबखान रोहिल्याची परिस्थिती गंभीर झाली. मराठे आपल्याला मारतील ही भीती त्याच्या मनात होती. मल्हारराव होळकराला त्याने आपल्या बाजूला वळवले होतेच.

मराठी फौजा आग्ऱ्यात आल्या. सूरजमल जाटाने खंडणी मान्य करून मराठ्यांशी स्नेह संपादला. यमुना ओलांडून मराठी फौजा दुआबात आल्या. अंताजी माणकेश्वराने सिंकदराबाद ताब्यात आणले. वजीर गाझीउद्दीनने रघुनाथरावास नजीबास दिल्लीहून काढून टाकण्यास सांगितले. दादाने अंतर्वेद परत ताब्यात आणण्याचा विचार चालवला होता. नजीबखानानेही धूर्तता दाखवून रघुनाथरावाकडे वकील पाठवून त्याची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न केला.

अंतर्वेद सहारनपूरपासून इटाव्यापर्यंत मराठी फौजांनी व्यापली. रघुनाथराव पेशवा ११ ऑगस्टला दिल्लीला आला. नजीबाने दिल्ली लढवण्याचा प्रयत्न केला. रोहिल्यांची उपासमार होत होती. दिल्लीत महागाई फार झाली. पंधराच दिवसात नजीबखानाने मराठ्यांशी शरणागतीचे बोलणे लावले. मल्हाररावास निरोप पाठवून धर्मपुत्र असल्याची जाणीव करून दयेची याचना केली. पुन्हा या भानगडीत पडणार नाही, असे कबूल करून हा खेळ्या नजीब रोहिलखंडात निघून गेला.

नजीब गेल्यावर रघुनाथरावाने आलमशहास तख्तावर बसवले. गाझीउद्दीनास वजिरी तर अहमदखान बंगशास मीरबक्षीगिरी दिली. मराठे कुरूक्षेत्राकडे निघाले.

दसऱ्याच्या मुहूर्तावर मराठी फौजा पंजाबाकडे निघाल्या. हाफीज रहमतखान, दुंदेखान यांचा पंधरा लाखात फैसला करून रघुनाथराव लाहोरकडे निघाला. अब्दालीने अफगाणिस्तानमध्ये परत जाताना शिखांचे सुवर्ण मंदिर उद्ध्वस्त केले होते. सरोवर मातीने भरून टाकले होते. ८ मार्च १७५८ ला मराठी फौजा सरहिंदला आल्या. मराठे येताहेत हे पाहिल्यावर अब्दालीचा मुलगा लाहोरहून पळाला. जाताना त्याने अनेक गुलामांना गुलामगिरीतून मुक्त केले. मराठ्यांमुळे आपण गुलामगिरीतून मुक्त झालो हे पाहिल्यावर एका गुलामाने धावत जाऊन मराठ्यांसाठी लाहोरच्या वेशींचे दरवाजे उघडले. मराठी फौज मोठ्या दिमाखाने लाहोरात आली. मानाजी पायगुड्यांच्या अधिपत्याखाली मराठी फौजांनी लाहोरचा ताबा घेतला. मराठी विजयाचे डंके लाहोरात झडू लागले. मराठी घोडी पंजाबात फुरफुरू लागली. मराठी स्वार लाहोरात घुमू लागले. भीमथडीचे हे लोण रावीतीरावर आले.